पुण्य नगरी

# ज्येष्ठ नागरिकांचा 'मुख्यमंत्री वयोश्री योजने'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## मनपाच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर ३४७० नोंदणी अर्ज जमा

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**नागपूर :** राज्य शासनातर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री वयोश्री योजने'ला शहरातील ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागपूर महानगरपालिकेच्या दहाही झोननिहाय असणाऱ्या ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आजवर ३ हजार ४७० नोंदणी अर्ज प्राप्त झाले आहेत.

राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साहाय्य साधने व उपकरणे खरेदी करण्यासाठी तसेच मनःस्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांच्या मार्गदर्शनात शहरात 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यात येत आहे. 'मुख्यमंत्री वयोश्री योजने'च्या अंतर्गत पात्र ज्येष्ठ लाभार्थ्यांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि ब्रेस, लंबर बेल्ट, सर्व्हाइकल कॉलर इत्यादी उपकरणे खरेदीकरिता थेट अर्थसाहाय्य देण्यात येत आहे.

मनपाच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात मुख्यमंत्री वयोश्री योजना नोंदणी अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. प्राप्त अर्जानुसार यूपीएचसीचे वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत ज्येष्ठांची आरोग्य तपासणी केली जात आहे. प्राप्त अर्ज हे समाज कल्याण विभागाला वर्ग केले जात आहेत. मनपाच्या दहाही झोननिहाय असणाऱ्या ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आजवर ३ हजार ४७० अर्ज प्राप्त झाले आहेत. मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे नोंदणी अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था आता ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांसह मनपाच्या दहाही झोन कार्यालय, आरोग्य वर्धिनी केंद्रांवर करण्यात आली आहे. तसेच आता दररोज या केंद्रांवर नोंदणी अर्ज स्वीकारले जात आहेत.

ज्येष्ठ नागरिकांनी आपल्याजवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाऊन वैद्यकीय तपासणी करून मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ घ्यावा व या योजनेसाठी अर्ज प्राथमिक आरोग्य केंद्रात भरून द्यावा, असे आवाहन मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी केले आहे.

Nagpur Edition Edition
Aug 24, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com